# छंद पुष्परचनेचा - १७

सध्या दर महिन्यात आपण पाश्चात्य पुष्परचनांची माहिती घेत आहोत. परंतु या महिन्यापासून भारतीय सण गणपती-दसरा-दिवाळी यांची सुरुवात होत आहे. त्या निमित्ताने भारतीय पद्धतीची फुलांची सजावट याबद्दल लिहावे असे वाटते.



हार, पुष्पगुच्छ, तोरण, फुलांची रांगोळी, फुलांच्या वेण्या, गजरे असे आपल्याकडेही अनेक पुष्परचनांचे प्रकार आहेत. फुलांच्या रांगोळीचे काही प्रकार यावेळी पाहू यात !

फुलांची रांगोळी काढताना आजूबाजूला मिळणारी पाने वापरावीत. शेवंती, जर्बेरा, झेंडू, गुलाब, ॲस्टर इत्यादी फुले आणि त्यांच्या पाकळयांचा वापर करता येतो.



पुष्परचनेप्रमाणेच फुलांची रांगोळी काढतानाही रंगसंगतीला खूप महत्व आहे. काही गडद रंगांची फुले, हिरवी पाने व काही फिक्या रंगांची फुले यांचा कलात्मकतेने उपयोग करावा. त्याचप्रकाणे रांगोळीतील आकार सारखे व सुबक येण्यासाठी प्रथम खडूने अथवा पेन्सिलने जेथे रांगोळी काढायची तेथे रांगोळी काढून घ्यावी व नंतर ती फुलांच्या पाकळ्यांनी भरावी.



अगदी सहजपणे काढता येतील अशा दोन गोल आकाराच्या रांगोळ्या वर दिल्या आहेत. तसेच एखाद्या कार्यक्रमाच्या वेळी कुठे बॉर्डर म्हणून रांगोळी काढायची असेल तर अशा फुला-पानांनी सजविलेल्या ३-४ बॉर्डरचे फोटो शेजारी दिले आहेत. आवश्यक असतील त्याप्रमाणे ती बॉर्डर लांब अंतरांपर्यंत काढता येईल.



सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर
asdssd@gmail.com